1387
15 JUN 2011

**नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम १९९९ नुसार संरक्षित असलेल्या जमिनींव्यतिरिक्त इतर जमिनींच्या विकासासाठी ना हरकत दाखल्याबाबत.**

महाराष्ट्र शासन.
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक नाजक २२११/प्र.क्र. १३८/नाजकधा-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ जून, २०११.

वाचा : १) शासन पत्र क्रमांक नाजक १०(२००८)/प्र.क्र.१/२००८/नाजकधा-१, दि.१ मार्च २००८, दि.३ मार्च २००८ व दि.११ जून २००९

२) शासन परिपत्रक क्रमांक नाजक २२०९/प्र.क्र.३५/नाजकधा-२, दि.१८ मार्च २००९.

## परिपत्रक

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम,१९७६ दि.२९।११।२००७ रोजी राज्यातून निरसित केला असून नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ अंगीकृत केला आहे. सदर निरसन अधिनियम, १९९९ ची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ नुसार मूळ कायद्याच्या कलम १०(३) व १०(५)

ची कार्यवाही करुन ताबा घेण्यात आलेल्या जमिनी व कलम २० खाली विविध प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनींना संरक्षण प्राप्त आहे.

निरसन अधिनियमानुसार संरक्षण प्राप्त नसलेल्या जमिनींच्या हस्तांतर/विकसन करण्यासंदर्भात शासनाने वर नमूद केलेली पत्र तसेच संरक्षित जमिनींबाबत परिपत्रकाव्दारे आवश्यक त्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. मात्र नाजकधा कायद्याच्या कक्षेबाहेर असलेल्या जमिनधारकांच्या अनुज्ञेय असलेल्या वा मे.व्होल्टास विरुध्द महाराष्ट्र शासन प्रकरणातील मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मोकळया करण्यात आलेल्या जमिनींच्या हस्तांतर/विकसनाबाबत संबंधित प्राधिकरणाकडून नाजकधा कक्षाच्या ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात येते. अशा स्वरुपाचे निवेदन शासनाकडे महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग फेडरेशनकडून प्राप्त झालेले आहे. सदर बाब विचारात घेऊन सर्व संबंधित प्राधिकरण/नियोजन प्राधिकरण यांना या परिपत्रकाव्दारे पुन्हा एकदा सूचना देण्यात येतात की, नाजकधा अंतर्गत प्राप्त जमिनींवर कलम १०(३) व १०(५) ची कार्यवाही करुन प्रत्यक्ष ताबा घेतला आहे, अशा जमिनी व कलम २० खाली निवासी/औद्योगिक/शेती वा तत्सम प्रयोजनासाठी सूट देण्यात आलेल्या जमिनींव्यतिरिक्त राज्यातील ९ नागरी समूहातील उर्वरीत जमिनींच्या विकसन/हस्तांतर व तत्सम कारणासाठी संबंधित जमिनधारक वा विकासक यांना शासनाच्या वा संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही, याची नोंद घ्यावी.

Scanned with CamScanner

मात्र कलम २० खालील विविध प्रयोजनार्थ सूट दिलेल्या जमिनींच्या हस्तांतर/विकसन व तत्सम कारणासाठी शासनाने वेळोवेळी दिलेले स्थायी आदेश/परिपत्रकातील सर्व अटी व शर्ती कायम रहातील याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(सुरेश काकाणी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, मुंबई/नागपूर/ पुणे/ नाशिक/ ठाणे/ कल्याण-डोंबिवली, सोलापूर/ सांगली/ कोल्हापूर/मिरा-भाईंदर, महानगरपालिका,
२) महानगर आयुक्त, एम.एम.आर.डी.ए.,बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई
३) अप्पर जिल्हाधिकारी/उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी. मुंबई/ठाणे/उल्हासनगर/पुणे/नाशिक/नागपूर/सोलापूर/कोल्हापूर/सांगली नागरी समूह,
४) उप सचिव, नगर रचना, नगरविकास विभाग,मंत्रालय, मुंबई
५) महानिरिक्षक, नोंदणी व मुद्रांकशुल्क, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) सर्व सह जिल्हानिबंधक, व मुद्रांकशुल्क, मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/नागपूर/सोलापूर/कोल्हापूर/सांगली
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. बांद्रे, मुंबई ५१
८) सर्व नगररचना कार्यासने, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी, नाजकधा-१,२ व ३ (निवडनस्ती), नगरविकास विभाग,
१०) निवडनस्ती.



Scanned with CamScanner